# जनसंपर्क अधिकारी
**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१
Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** ५७/२०२२ दि. २२/०२/२०२२

## मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर सुपारीने भरलेल्या ट्रकवर दरोडा टाकणा-या सराईत टोळीला मिरा - भाईदर, वसई - विरार पोलीसां कडुन अटक.

-------ooooo-------

दि.१७/०२/२०२२ ते दिनाक १८/०२/२०२२ चे रात्रौ दरम्यान तुंगारेश्वरचे जवळपास मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर फिर्यादी नामे - लक्ष्मण ओडेदरा रा. पोरबंदर गुजरात हे त्यांचे ताब्यातील ट्रक क्रमांक जी.जे २५ टी. ७१०० मध्ये १९.५ टन वजनाची सुपारी व रोख रक्कम असा एकुण ७४,९४,२५०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मॅगलोर ते गुजरात असे घेऊन जात असतांना एका अज्ञात चारचाकी वाहनातील ३० ते ४० वयोगटातील मास्क लावलेल्या ६ अनोळखी इसमांनी उपरोक्त ट्रकला वाहन आडवे लाऊन ट्रक मधील ड्रायव्हर व क्लिनर यांचे हात पाय सेलो टेपने बांधुन त्यांना चार चाकी वाहनात जबरदस्तीने बसवुन फिर्यादी यांच्या ताब्यातील ट्रक मालासह जबरी चोरी करुन नेला म्हणुन पेल्हार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर १६२/२०२२ भादंविसं कलम ३९७,३६५,३४२ प्रमाणे दिनांक १८/०२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाची गांभिर्याने दखल घेवुन गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणे बाबत वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा व विविध पोलीस ठाणे मधील अधिकारी व अंमलदार याचे १० पथके तयार करुन गुन्हयातील आरोपीतांचा शोध सुरु करण्यात आला. तपासदरम्यान गुन्हयात सहभाग निष्पन्न झालेला आरोपीत हा एका कंटेनरने गुजरात बाजुकडुन मुंबई कडे येत असले बाबत गुन्हे शाखेच्या पथकास माहिती मिळाली होती. त्याअनुषांगाने दिनांक २१/०२/२०२२ रोजी २३.०० वाजेपासुन गुन्हे शाखा कक्ष -२, ३ व मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पथक खानिवडे टोल नाका परिसरात सापळा रचुन थांबले होते.

दिनांक २२/०२/२०२२ रोजी अंदाजे ०२.१५ वाजेच्या सुमारस मिळालेल्या माहितीप्रमाणे गुन्हयातील सहभाग निष्पन्न झालेला आरोपीत हा कंटेनर क्रमांक एम.एच.०५ ए.एम. ३७४४ ने गुजरात कडुन मुंबई कडे येणा-या वाहिनीवरुन येतांना दिसला असता गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांचे कडील वाहनाने सदर कंटेनरचा पाठलाग सुरु करुन खानिवडे टोल नाक्याचे लगत असलेल्या सार्वजनीक शौचालय समोर गुन्हे शाखेचे पो.नि/ प्रमोद बडाख यांनी सोबतच्या पोलीस पथकाच्या मदतीने कंटेनर अडवीले व कंटेनर चालकास पोलीस असल्याचे सांगुन कंटेनर वाहन बंद करुन खाली उतरण्यास सांगीतले असता कंटेनर चालकाने बेदरकारपणे पोलीसांचा इशारा डावलुन पो.नि/ प्रमोद बडाख हे

कंटेनर समोर उभे असतांना जिवेठार मारण्याच्या उद्देशाने अचानक कंटेनर त्याचे अंगावर घातले. त्यावेळी पो.नि/ प्रमोद बडाख यांनी त्यांचे कडील सर्वीस पिस्टल कंटेरनच्या दिशेने रोखले तरी देखील कंटेनर चालक यांने त्यांचे दिशेने वाहन चालवुन नेले. त्यावेळी पो.नि/ बडाख यांनी स्वःरक्षणार्थ कंटेनच्या बोनेटवर एक राऊन्ड फायर केला तरी देखील कंटेनर चालक याने कंटेनर न थांबवील्याने पो.नि/ बडाख यांनी तात्काळ बाजुला होऊन कंटेनर रोखण्याच्या उद्देशाने कंटेनरच्या डाव्याबाजुकडील पुढच्या टायरवर ४ राऊन्ड फायर केले. त्यानंतर उपरोक्त पोलीस पथाकाने आरोपीताचा पाठलाग करत त्यास विरार फाटा सर्व्हीस रोडवर मुंबईकडे जाणा-या वाहिनीवर कंटेनर थांबवीण्यास भाग पाडुन कंटेनर चालक नामे – जयविर रामस्वरुप रा. मुजफ्फरनगर, राज्य उत्तरप्रदेश यास ताब्यात घेऊन सदर घटने बाबत उक्त आरोपीत विरुध्द विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २०७/२०२२ भा.द.वी.सं.कलम ३०७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अटक आरोपीत नामे -जयविर रामस्वरुप याचेकडे केलेल्या तपासादरम्यान पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर १६२/२०२२ भादंविसं कलम ३९७,३६५,३४२ प्रमाणे मधील इतर आरोपीत यांचे बाबत व त्यांनी गुन्हयात वापरलेले वाहनांबाबत खात्रीशिर माहिती मिळाल्याने गुन्हे शाखेचे पोउपनिरी/ पुष्पराज साळवे यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे पोउपनिरी/ सनिल पाटील यांना पोलीस पथकासह बोलाऊन मुंबई पोलीस आयुक्तालयातील मुलुंड पोलीस ठाण्याचे वपोनि/ श्री. कांतीलाल कोथमीरे व त्यांचे गुन्हे प्रकटीकरण पथकाची मदत घेऊन मुलुंड कॉलनी, मुलुंड पश्चिम परिसरातुन दरोडयात सामील आरोपीत नामे - १) सिध्दार्थ रमेश जन्मजेय वय ४१ वर्षे, रा. उल्हासनगर, २) कौसिम फारुख खान वय २२ वर्षे, रा. मोतीनगर, मुंबई ३) अत्तार मुस्तफा खान वय २६ वर्षे, रा. मोतीनगर, मुंबई. यांना ताब्यात घेत असतांना त्यांनी प्रतिकार करण्यास सुरवात करुन पोलीस पथकावर हल्ला केल्याने पोलीस पथक व आरोपीत यांच्यात झालेल्या झटापटी मध्ये पोउपनिरी/ सनिल पाटील यांचे सर्वीस पिस्तुलातुन १ राऊड हवेत फायर झाला आहे. आरोपीत यांना पोलीस पथकाने योग्य बळाचा वापर करुन ताब्यात घेतले असुन सदर घटने बाबत उक्त आरोपीत यांचे विरुध्द मुलुंड पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदवीण्यात येत असुन आरोपीत यांचे ताब्यात दरोडयाच्या गुन्हयातील जबरी चोरी झालेली सुपारी मिळुन आली आहे. अटक आरोपीत यांचे विरुध्द देशातील विविध राज्यात दरोडयाचे २५ पेक्षा जास्त, गंभीर स्वरुपाचे गुन्हे संघटीतपणे केले असल्याचे दिसुन येत आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. प्रशांत वाघुडे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -३, श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्ता, विरार विभाग, श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली, व.पो.नि/विलास चौगुले, व.पो.नि/ सुरेश वराडे, पो.नि/ प्रफुल्ल वाघ, पो.नि/ प्रमोद बडाख, पो.नि/ अविराज कुराडे, पो.नि/ शाहुराज रणवरे, पो.नि/ राहुल राख, पो.नि/ महेंद्र शेलार, सपोनि/ रजित परदेशी, सपोनि/ दत्तात्रेय सरक, सपोनि/ अमोल आंबवने, सपोनि/ कैलास टोकले, सपोनि/सचिन सानप, सपोनि/ नितीन बेंद्रे, सपोनि/ प्रशांत गांगुर्डे, पोउपनिरी/ हितेद्र विचारे, पोउपनिरी/ कैलास सोनवणे, पोउपनिरी/ संदेश राणे, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भगवत, पोउपनिरी/ सनिल पाटील, पोउपनिरी/ पुष्पराज सुर्वे, व अंमलदार सर्व नेमणुक मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.